


म. ग्रं. सं. वाचनालय,
विषय बा.प.
दा. क्र. २९९२
BVBK-0402992

२९९२ ८।७।८

# फिरकी

वसंत बापट

*एक सरळ*
*एक तिरकी*
एक भोळी
एक बेरकी
प्रत्येक कविता
एक एक फिरकी !

२९९२ ८।७।८
ला.वा.



चित्रे : चंद्रमोहन कुलकर्णी

BVBK-0402992

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

फिरकी

© वसंत बापट

पहिली आवृत्ती : २५ जुलै १९९२

प्रकाशक : ग. प्र. प्रधान
साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०


मुद्रक : ग. प्र. प्रधान
साधना प्रेस
४३१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ आणि चित्रे : चंद्रमोहन कुलकर्णी

ऑफसेट मुद्रण : मुद्रा
३८३ नारायण पेठ
पुणे ४११ ०३०

किंमत २०-०० रुपये

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्टने अनुदान दिलेले आहे.



## ९ : *विक्रम*


एका सायकल-स्वारानं
मोठा विक्रम केला
दोन्ही चाकं पंक्चर, तरी
घाट चढून गेला

एका खादाडखाऊचे
खाणे किती दांडगे
शंभर लाडू, शंभर जिलब्या
परातभर सांडगे

आळशीराव झोपाळू
शंभर तास झोपले
चटईच्या अंथरुणावर
उशी एक टोपले

न थांबता बोलण्याचा
आम्ही केला विक्रम
नाव ठेवलं लोकांनी
वटवटराव चक्रम

मग आम्ही गप्प बसलो
पुरा एक तास !
हा मात्र मानला जातो
आमचा विक्रम खास !!



## २ : नाटकाची जाहिरात

नाटक नाटक नाटक
उद्या करणार नाटक
संध्याकाळी चार वाजता
उघडणार फाटक

नाटक लिहिलंय भाईने
साड्या दिल्यात आईने
परवानगीनं बाबांच्या
मिशा रंगवू शाईने

*आमच्या नाटकामधे आहे बनी राणी*
*गोरा घारा मन्या दिसतो राजावाणी*
*धमाल म्हणजे मी होणार विदूषक*
*कमाल म्हणजे ताई गाणार आहे गाणी*

आईबाबांसकट
सगळेजण या फुकट
नाटकानंतर सगळयांसाठी
पोहे तिखटमिखट !



## ३ : देवाच्या चुका


देवा नारायणा तुमच्या
मोजू का मी चुका ?
मी लहान म्हणून तुम्ही
चिडू मात्र नका

गुलाबाची नाजूक फुलं
टिकाऊ का नाहीत ?
रंगीत फुलांत वास घालणं
विसरलात ना घाईत ?

हपूस आंब्यात विनाकारण
केवढी मोठी कोय ?
आणि एका कलिंगडात
हजार बिया होय ?

जरदाळूतल्या बदामांवर
कशासाठी साल ?
अक्रोडांचं कवच म्हणजे
फुक्कट आमचे हाल !

आता निदान पुढल्या वेळी
नीट करा सगळे....
कावळे थोडे गोरे करा
रंगीत करा बगळे !!



## ४ : *जादूचा पक्षी*



बाबा मला गाढव म्हणतात
सर म्हणतात शंख
मी तर पक्षी जादूचा
उद्या फुटतील पंख

गरूड होऊन आभाळात
उंच उंच जाईन
परत खाली आल्यावर
बुलबुल होऊन गाईन

गर्द हिरव्या आंबेवनात
कोकीळ म्हणून शिरेन
बाहेर येऊन पोपट होऊन
भिर्र भिर्र फिरेन

कधी होऊन खंड्या पक्षी
अचूक टिपेन मासा
पाण्यावरती तरंगताच
हंस होईन खासा

कधी कावळा कधी चिमणा
कधी भारद्वाज
कधी कोंबडा तुर्रेवाला
होईन कुर्रेबाज

मोर मात्र होणार नाही
सुंदर असला तरी
कोणी तरी पकडून मला
बंद करतील घरी !



## ५ : *वेडाबाई*

आमच्या घरात चिमणी आली
भिऊन कावरीबावरी झाली
भिरभिर मारी शंभर चकरा
आरशावरती घेतल्या टकरा
खिडकीमधल्या काचेमधून
कसे जाता येईल पळून ?
गरगर फिरत होता पंखा
धक्का लागला तिच्या पंखां



फडक्याचा मी चेंडू केला
त्याचा नेम वाया गेला
थरथर कापत चिमणाबाई
तसबिरीच्या मागे जाई
झाडावरती अंगणामधल्या
शंभर बहिणी गोळा झाल्या
त्यांची चिवचिव कानी पडली
तेव्हा वेडाबाई उडली

फिरून उद्या वाट चुकेल
शहाणपण ती कधी शिकेल ?




## ६ : *चिमणं पाखरू*

चिमणीपेक्षा चिमणं पाखरू
अंगणामध्ये येतं
गवतफुलांत चोच घालून
मध शोषून घेतं

केशरी पोट, जांभळे पंख
चोच लांबट सुई
कारंज्याच्या काठावरती
नाचतं थुई थुई

तारेवरती झोका घेत
वाकडी करतं मान
टिटिर टिटिर गाणं त्याचं
त्यात नसते तान



जरा ऊन झाल्यावरती
झाडीत लपून बसतं
कुणाला मग दिसत नाही
फक्त मलाच दिसतं

मला वाटतं गेल्या जन्मी
असेन त्याचा भाऊ
टिटिर टिटिर हाक मारून
म्हणतं रानात जाऊ !



## ७ : गुपीत

पहिल्या जन्मी मोर होतो
तेव्हा मनामधे यायचं
पुढल्या जन्मी कोकिळ होऊन
आमराईत गोड गायचं !

दुसऱ्या जन्मी कोकिळ झालो
कुहू कुहू गाताना
मी पाहिला पोपट एक
कच्च्या पेरू खाताना !

मग मी पण पोपट झालो...
आमचं नशीब कसचं काय
पिंजऱ्यात बंद केल्यावर
दुबळे पंख अधू पाय !

या जन्मी फिटली हौस
पावसामध्ये नाचत जातो
आंब्याखाली गातो कधी
कधी कच्चे पेरू खातो !

लोक म्हणतात पोराचं
लक्षण ठीक दिसत नाही
नाचतो काय गातो काय
अभ्यासाला बसत नाही !

मी हसतो मनामधे...
यांना ठाऊक नाही गुपीत
माझ्या मनात अगदी आत
ठेवून दिलंय् बंद कुपीत !



## ८ : वेडा पाऊस

पाउस वेडा वळवाचा    तडतड ताशा वाजे
छपराखाली वळचणिला    अंकुर आले ताजे

सडा अंगणी गारांचा    टपटप बोरांवाणी
गारा वेचत वेचत या    नाचत मोरावाणी

गडगडती ढग रागाने    कडकड करते बिजली
मुकी पाखरे थरथरती    थेंबोथेंबीं भिजली

कडेकडेने रस्त्याच्या    खळखळ पाणी वाहे
आज कागदी होड्यांची    जंगी शर्यत आहे

ज्याची होडी शेवट ये    पहिला नंबर त्याचा !
गुच्छ तयाला देऊ या    थेंबांच्या मोत्यांचा !!



## ९ : *आमचे बाबा हुशार*

गणित सोडवताना माझ्या
नऊ येतात नाकी
अडतीस उणे एकोणतीस
अवघड वजाबाकी

रोज रोज पाढे घोकतो
तरी चुकते बेरीज
एवढ्या बेरजा करणार कशा
मदत घेतल्याखेरीज

गुणाकार, भागाकार
वर्गमूळ काढा
कसा येणार आम्हांला
तिसापुढचा पाढा ?

घरीदारी ढ म्हणतात
हा कसला न्याय ?
गणितानं डोकं दुखतं
त्याला उपाय काय ?

आमचे बाबा गणितामधे
चुकत नाहीत कोठे....
खिशामधलं गणकयंत्र
हुशार आहे बेटे !



बाबा म्हणतात, ‘ खेळणी नव्हेत चाकू, कात्र्या, सुऱ्या ’
निक्काल लागला, हस्तकलेत वाजणार आमचा बोऱ्या

आई सांगते, ‘ हातात कधी घ्यायचं नाही कोलीत ’
म्हणजे आम्ही दिवाळीत कोंडून घ्यायचं खोलीत

सरांचा तर सारखा लकडा, ‘ खेळू नको गोट्या ’
काही खेळलो नाही तर होईन ढेरपोट्या

राहता राहिला आमचा टीव्ही... ऊर्फ खुळचट खोके
‘ लावू नको, पाहू नको ’ फिरले आमचे डोके




## ११ : राजेशाही बाबा

ऑफिसात जाताना बाबांची घाई
सारखी कशी नाचत असते बिच्चारी आई
‘ रुमाल आण, मोजे पहा
कपात लौकर ओत चहा
अगऽ माझ्या पेनमधे भरली नाहीस शाई ’

माझं पहा, सगळी कामं माझी मीच करतो
रोज रात्री झोपण्यापूर्वी दप्तर मीच भरतो
मीच घालतो बूटमोजे
पाठीवरती घेतो ओझे
मुकाट्यानं दूध पिऊन माझी वाट धरतो

एवढं असून त्यांना आई काही बोलत नाही
म्हणत नाही, मुलांकडून शिका जरा काही !
अशानंच ते लाडावतात
आईलाच राबवतात
आई म्हणते “ राजांचं सगळंच राजेशाही !”



## १२ : द्या उत्तर

आमचे बाबा एवढे हुशार
त्यांना येतं सगळं काही
आम्ही म्हणतो, गोष्ट सांगा
तेवढं मात्र येतच नाही

आईचीही तीच कथा
ती शाळेची मोठी बाई
आम्ही म्हणतो, गाणं म्हण
तेवढं तिला येतच नाही

धुणी धुवून, भांडी घासून
भागूबाईची दुखते कंबर
लिहिणे वाचणे शून्यभोपळा
गोष्टी-गाण्यांत पहिला नंबर

शाळेत मुलं घातलीच पाहिजेत
असा म्हणे आहे कायदा
गोष्टीत ढेग, गाण्यात ढेग
मग शिकून काय फायदा ?



## १३ : तुझं माझं जमेना

‘ आई गऽऽ बघ ना
दादा काढतो चिमटा ’
**‘ नाही ग आई, मला**
**हीच म्हणते भामटा ’**


‘ आई माझी नवी पेन्सिल
यानं काल पळवली ’
**‘ बाबांच्या कपाटातून**
**सांग की, कशी मिळवली ?**

‘ दादिटला, खापिटला
माझं पेन मोडलं ’
**‘ तू का मग वहीमधलं**
**माझं ड्रॉइंग खोडलं ?’**

‘ आई गऽऽ, दादा मला
इंग्लिश शिव्या देतो ’
**‘ स्टुपिड् आणि इडियट्**
**शब्द घोकत होतो ’**

*‘‘ तुमच्यापैकी एकाला*
*बोर्डिंगातच ठेवू... ’’*
**‘ त्यापेक्षा चार दणके**
**देऊ आणि घेऊ !’**

२९९२
बा.वा.





## १४ : कटकट

मला काही सांगू नका...
बहीण म्हणजे कटकट नुसती
एक नंबरची हळूबाई
नाही मस्ती, नाही कुस्ती

झाडावरती चढत नाही
काढत नाही एक पेरू
‘ आई यानं पेरू चोरला ’
चहाड्या मात्र चुरूचुरू

आम्ही मित्र क्रिकेट खेळतो
तिला कधी घेत नाही
सगळे कॅच सोडून देते
बॅटिंग बोलिंग येत नाही

चिमा काय कामाची ?
कशाकशात नाही मदत
साधा गुद्दा मारला तर
बाईसाहेब बसतात रडत

मात्र जर ती घरात नसली
मला बरं वाटत नाही
आम्ही भाऊ प्रेमळ असतो
आमचं प्रेम आटत नाही !!



# १५ : शोध

मी मोठा झाल्यावरती
संशोधक होणार आहे
एकामागून एक शोध
नवे नवे लावणार आहे

अशी मोटार करीन एक
पाण्यावरती बोट होईल
रस्त्यात गर्दी झाली तर
आभाळात झेप घेईल

घरालाही पंख लावीन
' चलो ' म्हणेन ' महाबळेश्वर '
तिथे जर का पाऊस आला
घरच नेईन ढगांवर

शाळेसाठी ' गोळी ' शोधेन
सगळा अभ्यास एका गोळीत
शाळेत प्रवेश घेण्यासाठी
नका उभे राहू ओळीत

माझा एक शोध तर
कल्पनेच्या पलीकडील
एका रात्रीत छोटे करीन
प्रत्येकाचे आईवडील




## १६ : आयडिया

भिंत मोठ्या धरणाची
सेकंदभर उचलायची
पाणी वाहून जाण्याआधी
झटकन् खाली ठेवायची
...कशी आहे आयडिया ?

लोहचुंबकांची रास
खंडाळ्याला रचली तर
कर्जतपासून आगिनगाडी
विजेशिवाय येईल वर
...माझी टॉप आयडिया !

समजा, इथून बोगदा खणला
थेट अमेरिकेत जाईल
इकडून जाता मनीमांजर
मिकीमाउस वरती येईल
...याचं नाव आयडिया !

अशी एकेक आयडिया
रोज माझ्या डोक्यात उठे
तरीही मी हुशार आहे
हे बाबांना पटतंय कुठे ?
...फुक्कट आमच्या आयडिया !




## १७ : कमाल पाहुणे

मला आणि ताईला आईनं बजावलं
पाहुणे आल्यावरती शहाणं वागायचं
रडायचं नाहीऽ, ओरडायचं नाहीऽ
सारखं सारखं खायला नाही मागायचं

बाबांनी सांगितलं, जेवणाच्या वेळी
मला तुला करून भांडायचं नाही
पान कसं अगदी स्वच्छ करायचं
इकडे तिकडे काही सांडायचं नाही

पाहुण्यांच्या बरोबर छोटी बेबी येईल
जरीदेखील तिला रडवायचं नाही
गावंढळासारखं दुधाच्या कपात
बोटांनी बिस्किट बुडवायचं नाही

पाहुणे आले मग भल्या पहाटे
आल्याआल्या त्यांनी मागितला चहा
चहात बुडवली दोनचार बिस्किटे !
मी म्हटले ताईला, ' अग पहा पहा !!'



## १८ : रविवारचा बेत

या रविवारी
सक्काळी जायचं
रात्र झाल्यावर
मग घरी यायचं
सक्काळी टँकवर
चिक्कार पोहायचं
आम्हांला मग तुम्ही
हॉटेलात न्यायचं
मागू ते द्यायचं
थम्स अप प्यायचं
पार्कात प्राणी
बघत फिरायचं
वाघ-सिंहांना
कुणी नाही भ्यायचं
झाडांच्या सावलीत
खूऽऽप खेळायचं
तिथून सुटायचं
पिक्चर पाह्यचं
थेटरमधेच
आइस्क्रीम खायचं
नाइलाजानं
घरी निघायचं
दमल्यावर आईनं
कुशीत घ्यायचं !
तिच्यावर उपकार
म्हणून निजायचं !!





## १९ : सहल

उद्या आमची सहल आहे
आम्ही दूर जाणार
दिवसभर मजाच मजा
खेळणार आणि खाणार

चोर शिपाई, खजिना शोधा
नवे खेळू खेळ
पिशवी भरून नेणार आहो
आम्ही सुकी भेळ

डब्यामधे आई देणार
भाजी आणि पुरी
सुभ्या आंबे आणणार आहे
मी नेणार सुरी

काका देणार पत्तेजोड
खेळण्यासाठी रमी
बाबा देणार परवानगी !
यार ! हे काय कमी !!



## २० : तक्रार


पुस्तक ! पुस्तक !
उठलं माझं मस्तक !
सारखं आपलं वाचन करा, वाचन करा, वाचन करा...
केव्हा तरी सांगा की गाणी गात फेर धरा !

एकसारखं टुमणं
सक्काळपासून घुमणं
' दहा गणितं सोडवा, दहा गणितं सोडवा...'
अरे निदान आवाजात असू दे की गोडवा !

सारखा आपला संदेश
मुलांनाच उपदेश
' वेळ नका घालवू, वेळ नका घालवू...'
मग तुमच्या कामासाठी नका आम्हां बोलवू !

मी जाणार लांब लांब
तुम्ही म्हणाल थांब थांब
मी नाही ऐकायचा, मी नाही ऐकायचा...
सांगून ठेवतो सुट्टीमधे पाढे नाही घोकायचा !

सदा आमच्यासाठी
कपाळावर आठी
कसं कुणा कळेना, कसं कुणा कळेना...
एकसारखा मार खाऊन घोडादेखील पळेना !



## २१ : *अन्याय*

सगळी गणितं बरोब्बर
तरी सर भोपळा देतात
वर्गामधली हसतात मुले
सर माझा कान धरतात

बाबा म्हणतात, पुढल्या वेळी
दहा तरी मिळवा गूण
नाही तर... पाच बोटे
गालावरती उठेल खूण

मग पुढल्या परीक्षेत
स्वच्छ कोरा पेपर दिला
पुन्हा एकदा सरांनीही
दिला शून्य भोपळा मला

मी सरांना म्हटलं, ‘ सर,
प्रश्नपत्र वाचून पहा
टापटिपीला ठेवले आहेत
तेवढे मार्क द्या की दहा !’



## २२ : लढाई

देशासाठी गांधीजींनी
जेव्हा मोठी चळवळ केली
आमच्या आजोबांची तेव्हा
तीन वर्षं तुरुंगात गेली

आजी एवढी पेद्रू असून
तिलादेखील तुरुंगात ठेवलं
बिचारीची कथा ऐकून
माझ्या डोळ्यांत पाणी आलं

आमची मम्मी, आमचे पप्पा
यांना मात्र सगळी गंमत
इंग्रजांशी लढतील कुठून ?
त्याला मिष्टर लागते हिंमत !

आम्ही इथे लढणार नाही
मंगळावर चालून जाऊ
तिथल्या राक्षसांशी लढून
आम्ही मंगळ जिंकून घेऊ

गुलमोहोर सुकल्यावरती
जेव्हा शेंगा खाली पडणार
तेव्हा बनवून तलवारी
लढाईची प्रॅक्टिस करणार !!




## २३ : एकटा

डोंगरकुशीत आमचं घर
शाळा पडते खूपच लांब
घरी माझ्या सोबतीसाठी
ओसरीवरचा एकच खांब

खांबावरती धावऱ्या मुंग्या
संख्या मोजत बसतो मी
उलटीसुलटी लगबग बघून
गालामधे हसतो मी

वळचणीला कावळा येतो
बाकी सगळा शुकशुकाट
किती काव काव केली तरी
मी आपला बसतो मुकाट

वडील माणसं कामावरती
मागे उरतो मीच एकटा
माझ्याशीच मी खेळत बसतो
काय करणार ? पडलो धाकटा !



## २४ : आमचा मामा



बबनमामा आला म्हंजे
आमची नुसती मजा
बाबादेखील त्याच्यासाठी
घेऊन टाकतात रजा

सैल ढगळ त्याचा कोट
पिशवीएवढे खिसे
खिशामधे जर्दाळूचे
झाडच असते जसे

मामी त्याला ध्यान म्हणते
अवतार म्हणते आई
कोणी काही म्हणा, त्याला
त्याचं काही नाही

त्यांच्या घरी बाळं नाहीत
म्हणून इकडे येतो
आम्ही बसतो मांडीवर
मामा पापे घेतो

मिशा टोचल्या, म्हटलं तर
ढगासारखा हसतो
कुणास ठाऊक कशासाठी
मधेच डोळे पुसतो !

## २५ : महमदभाई

महमदभाई पैलवान घट्टमुट्ट गट्टा
तो आमच्या गावामधला तालीमबाज पट्टा
बोला त्याशी लाडीगोडी
कध्धी काढू नका खोडी
काढलीतच तर सांभाळा... पाठीत बसेल रट्टा

गावामधे पहिला नंबर महमदभाइचा टांगा
त्याची खडखड ऐकल्यावर तो किती जुना सांगा
टांग्यामधे बसू नका
बसलाऽत तर हसू नका
हसलाऽत तर तो म्हणेल ' ज्या बे टाकीत टांगा !'

टरक्या टरक्या डोळ्यांचं महमदभाइचं तट्टू
तिरक्या तिरक्या मानेचं बुटकं बजरबट्टू
त्याचा रुबाब तरी पहा
नाव त्याचं शहेनूशहा
त्याची टिंगल केलीत तर भाई होतील खट्टू !

आडवा तिडवा महमदभाई बघून नका भिऊ
डोळे गरगर फिरतात म्हणून पळून नका जाऊ
भाबीजींशी झाला तंटा
गुरगुर करतिल एक घंटा
तंटा मिटता बच्चेलोकां बेदाण्यांचा खाऊ !




## २६ :  वांदरसेना आली



हुप हुप हुर्योऽऽ वांदरसेना आऽली
लहानथोर सर्वांची घाबरगुंडी झाऽली


धडाडधुम धडाडधुम पत्रे किती वाजवतात
किचिकिचि खिचिखिचि धूमधाम माजवतात
वेडावून दाखवतात, लाल कुले खाजवतात
आई म्हणते कुठून आली काळतोंडी मेऽली
हुप हुप हुर्योऽऽ वांदरसेना आऽली



गच्चीवरती आजीचे पापड फस्त केऽले
अंगणामधले शेंगदाणे मुठीमुठी नेऽले
भराभरा पोरे घेऊन जांभळीवरती गेऽले
टपाटपा सडा कसा पडे झाडाखाऽली
हुप हुप हुर्योऽऽ वांदरसेना आऽली

कानामधे सांगू का ? वांदरं मला आवडतात
छपरावरच्या कौलांवरून कशी छान गडगडतात
नको तिथे अडमडतात, जिथे तिथे धडपडतात
मुलं बिनशेपटीची वांदरं शेपुटवाऽली
हुप हुप हुर्योऽऽ वांदरसेना आऽली





## २७ : *विदूषक*

खरं सांगू ? विदूषकच सर्वात जास्त शहाणा
त्याचे चाळे त्याचं वेड म्हणजे फक्त बहाणा

उंच उंच झोके घेणं... हा तर त्याच्या हातचा मळ
धप्पकन खाली पडणं... याला मिष्टर लागतं बळ

त्यानं शेपूट ओढली तरी वाघ त्याला रागवत नाही
आपल्यापैकीच एक म्हणून माकड नीट वागवत नाही

आखुड झगावाली छोकरी छत्री घेऊन नाचत येते
विदूषक आडवा येता छत्रीचाच फटका देते

विदूषक ओणवा होतो तसाच फिरतो रिंगणावर
प्रेक्षकांना हसवायसाठी चापट्या मारतो ढुंगणावर

वाघ सिंह हत्ती घोडे एकजात त्याचे मित्र
त्याला ढकला, पिटा, बुकला... गमत्या हेच त्याचं चित्र

सगळे खेळ येतात तरी येत नाहीत असा वागतो
सर्कशीचा राजा असून टोपी काढून भीक मागतो

विदूषक नसला तर सर्कशीत गंमत नाही
मार खाऊन हसवण्याची दुसऱ्यांजवळ हिंमत नाही !




किलिकिलि किलिकिलि विच्‌विच्‌ विच्‌विच्‌
पिंगपाँग्‌ डिंगडाँग्‌ गाऽऽमा
आओ, बैठो, देखो मेरा जादू का हंगाऽमा

माझ्या हाती बावन पत्ते
एकच उचला हलक्या हाते
उचल्या क्या ? अब वापस डालो
बदाम राणी ? सच्ची बोलो
या जादूचा आहे मंतर छाछू हरिहरि राऽमा
किलिकिलि किलिकिलि विच्‌विच्‌ विच्‌विच्‌
पिंगपाँग्‌ डिंगडाँग्‌ गाऽऽमा

दुसरी जादू बघा कमाल
देखो, है ना निळा रुमाल ?
रुमाल लाव्या... हो गइ पोळी ?
बाहर आयी मीठी गोळी ?
शिकून घ्या ही मीठी जादू येइल तुमच्या काऽमा
किलिकिलि किलिकिलि विच्‌विच्‌ विच्‌विच्‌
पिंगपाँग्‌ डिंगडाँग्‌ गाऽऽमा

कोकम सरबत देखो आमूचे
साखर डाल्या चारच चमूचे ?
गच्चम्‌ ठेवा डोळे बंद...
गट्टम्‌ केला ग्लास सबंध ?
माझी जादू फार बिलंदर करते तुमचा माऽमा
किलिकिलि किलिकिलि विच्‌विच्‌ विच्‌विच्‌
पिंगपाँग्‌ डिंगडाँग्‌ गाऽऽमा






## २९ : समज आई

समज आई, मी जर पुढे गावसकर झालो
वेस्ट इंडिजला मार देऊन तिथून परत आलो
तू माझ्या स्वागताला मुंबईपर्यंत येशील ?
म्हणेन तेवढं च्युईंगम तेव्हा तरी देशील ?

समज आई, मी जर पुढे मोठ्ठा गायक झालो
तिकडे गाणं ऐकवायसाठी अमेरिकेत गेलो
तुझ्यासाठी काय आणू तिकडून ? सांग मला
सेंटची एक बाटली तरी नक्की आणीन तुला

समज, मी जर मोठेपणी लष्करात गेलो
शत्रूसह लढता लढता, समज... जखमी झालो
तर मला विमानानं आपल्या घरी आणशील ?
जखमेवरती फुंकर घालत हळूच हळद लावशील ?

समज, काहीच झालो नाही, लोक मला हसतील
तुमचा मुलगा वेडा आहे हेच घोकत बसतील
वाट्टेल तशी नावं ठेवतील मला कुणीकुणी
तू मात्र म्हणशील ना, माझं बाळ गुणी ?



# ३० : कुंपण

आई आपल्या घराला
किती मोठ्ठं कुंपण
तारांमागे काटेरी
का ग रहातो आपण ?

    पलीकडे कालव्याजवळ
    मोडक्या तुटक्या झोपड्या
    मुलं किती हडकुळी
    कळकट बायाबापड्या

लोक अगदी घाणेरडे
चिवडतात घाण
पत्रावळीतलं उष्टं म्हंजे
त्यांचं जेवणखाण

    काळा काळा मुलगा एक
    त्याची अगदी कमाल
    हातानंच नाक पुसतो
    खिशात नाही रुमाल

आंबा खाऊन फेकली मी
कुंपणाबाहेर कोय
त्यानं म्हटलं ‘ घेऊ का ?’
मी म्हटलं ‘ होय ’

    तेव्हापास्नं माझ्या पोटात
    कुठं तरी टोचतंय
    झोपताना गादीमधे
    कुंपण मला बोचतंय...

BVBK-0402992

**वसंत बापट यांचे**
**प्रकाशित बालसाहित्य**

**नाट्य :**
बाल गोविंद (पॉप्युलर प्रकाशन, मुंबई)

**कविता :**
चंगामंगा (श्रीविद्या प्रकाशन, पुणे)
अबडक तबडक (श्रीविद्या प्रकाशन, पुणे)
आम्ही (परचुरे प्रकाशन, मुंबई)

आणि आता तीन नवी पुस्तकं :
**गरगर गिरकी**
**फुलराणीच्या कविता**
**फिरकी**

या तिन्ही पुस्तकांतल्या खूपशा कविता 'सकाळ'च्या 'सुटीचं पान' या सदरात प्रसिद्ध झालेल्या आहेत.